2096-99

I N T E R N A T I O N A L R E S E A R C H F E L L O W S A S S O C I A T I O N

Impact Factor - 6.261

E-ISSN - 2348-7143

INTERNATIONAL RESEARCH FELLOWS ASSOCIATION'S

# RESEARCH JOURNEY

International E-Research Journal

PEER REFREED & INDEXED JOURNAL

Vol. 6, Issue 2

April-May-June 2019

**Chief Editor -**
Dr. Dhanraj T. Dhangar,
Assist. Prof. (Marathi)
MGV'S Arts & Commerce College,
Yeola, Dist - Nashik [M.S.] INDIA

**Executive Editors :**
Prof. Tejesh Beldar, Nashikroad (English)
Dr. Gajanan Wankhede, Kinwat (Hindi)
Mrs. Bharati Sonawane-Nile, Bhusawal (Marathi)
Dr. Rajay Pawar, Goa (Konkani)

RESEARCH JOURNEY

This Journal is indexed in :

- University Grants Commission (UGC)
- Scientific Journal Impact Factor (SJIF)
- Cosmoc Impact Factor (CIF)
- Global Impact Factor (GIF)
- International Impact Factor Services (IIFS)

SWATIDHAN PUBLICATIONS

For Details Visit To : www.researchjourney.net

**'RESEARCH JOURNEY'** *International E- Research Journal*
Impact Factor - (SJIF) - 6.261, (CIF ) - 3.452(2015), (GIF)-0.676 (2013)
Vol. 6, Issue 2
**UGC Approved Journal**
E-ISSN : 2348-7143
April-May-June 2019


| | | | |
|---|---|---|---|
| 108<br>30 | कृष्णा अग्नीहोत्री के साहित्य में चित्रित नारी समस्या | सरला गोसावी | 145 |
| 31 | अंहिसक आंदोलन में स्त्री उपस्थिती | डॉ.विपिन शर्मा | 148 |
| 32 | पर्यावरण साक्षरता मिशन | डॉ. सुनिल चव्हाण | 152 |
| 33 | संत नामदेव : भक्ती आणि कवित्व | डॉ. शशिकांत साळवे | 158 |
| 34 | विकास प्रक्रियेतील महिला आणि स्वातंत्र्य | डॉ.प्रल्हाद दुधाने | 162 |
| 35 | माध्यमे, समाजमाध्यमे आणि सामाजिक वास्तव | प्रा. बालाजी दमकोंडवार | 168 |
| 36 | समकालीन आदिवासी साहित्य : स्वरूप आणि प्रेरणा | डॉ.काशिनाथ बऱ्हाटे | 174 |
| 37 | 'तहान' आणि 'बारोमास' समकालीन ग्रामीन जीवनातील दाहक वास्तव | प्रा.मीनाक्षी भोयर | 186 |
| 38 | अनुसूचित जातीतील विद्यार्थ्यांची अभिरुची, समायोजन आणि शैक्षणिक संपादणूक यांचा अभ्यास | डॉ.सुनिता पाटील व आम्रपाली भद्रे | 193 |
| 39 | संत तुकाराम: जीवन आणि कार्य | डॉ. शशिकांत साळवे | 199 |
| 40 | इयत्ता ११वी च्या कला व विज्ञान शाखेच्या विद्यार्थ्यांच्या चिंता पातळीचा अभ्यास | डॉ.संगीता भालेराव | 202 |
| 41 | आदिवासी समूहात जादूटोणा-भूतावाधा यांवर भगाताकडून केल्या जाणाऱ्या उपाय योजना : एक चिकित्सक अभ्यास | श्री. सुर्केद्र वळवी | 206 |
| 42 | माधव कोडविलकरांच्या कादंबऱ्या | शरद मानकर आणि डॉ. रेखा वडीखाये | 211 |
| 43 | आचार्य विनोबा भावे : शिक्षण | डॉ. प्रविण कारंजकर | 217 |
| 44 | दिवाळी अंकांचे स्वरूप व परंपरा | सौ.योगिता राजकर | 222 |
| 45 | 'फेसाटी' : लेखन विशेषांचा शोध | प्रा. बाळासाहेब कटारे | 226 |
| 46 | महानुभावीय चरित्रग्रंथ | डॉ.भास्कर शेळके | 230 |
| 47 | महाराष्ट्र विधिमंडळाच्या नागपूर अधिवेशनाचा उगम, उद्देश व स्वरूप | प्रा.वर्षा चंदनशिवे | 234 |
| 48 | शैक्षणिक ग्रंथालयात माहिती तंत्रज्ञाचे महत्त्व व वापर | डॉ.प्रशांत पगाडे | 240 |
| 49 | ओवीगीतांचे संशोधन | डॉ.भास्कर शेळके | 244 |
| 50 | पूर्व विदर्भातील टसर रेशीम उद्योगाची निर्माण प्रक्रिया आणि उत्पादन | हरिश्चंद्र कैताडे | 247 |
| 51 | संत तुकोबांच्या अभंगातील अध्यात्मनिष्ठा | डॉ.राजश्री पवार | 254 |
| 52 | सुरेश भटांच्या काव्यातील निसर्ग चित्रण | डॉ.राजेश देशपांडे | 257 |
| 53 | 'हसऱ्या कथा गंगाधर गाडगीळांच्या'-संपादक : डॉ विजया देव | प्रा. प्राची जोशी | 261 |
| 54 | बहिणाबाई चौधरी :एक जीवनविषयक तत्त्ववेत्त्या | डॉ. पल्लवी ताजने | 266 |
| 55 | नाशिक जिल्हातील कोकण जमातीच्या बोलीची वैशिष्ट्ये | डॉ.के.एन.सोनवणे व प्रा.मधुचंद्र भुसारे | 271 |
| 56 | महाराष्ट्र ग्रामीण रोजगार हमी योजनेचा लाभार्थ्यांच्या आर्थिक व सामाजिक परिस्थितीवर झालेला परिणाम | डॉ.संबोधी देशपांडे | 274 |
| 57 | माध्यमिक शाळेतील विद्यार्थ्यांची विज्ञान विषयातील अभिरुचीचा अभ्यास | डॉ.विजेंद्र पुराणिक | 279 |
| 58 | आदिवासींचे विधीनाट्य : दशक्रिया | डॉ. अंजली मस्करेन्हस | 283 |
| 59 | महाराष्ट्रातील बौध्दधम्माचे विज्ञानवादी व मानवतावादी केंद्र | प्रा.भिमराव पांडवे | 289 |
| 60 | भारतीय समाजातील समतेचे वास्तव | प्रा.रीता धांडेकर | 295 |
| 61 | डॉ. बावस्कारांचा महत्त्वपूर्ण वैद्यकीय शोध | डॉ.संगीता चव्हाण | 300 |
| 62 | कृषिक्षेत्रातील ऋषितुल्य संशोधक दादाजी खोब्रागडे : कार्य आणि कर्तृत्व | प्रा. डॉ. धनराज खानोरकर | 303 |
| 63 | नागपूर राज्याशी झालेला १८२९ चा तह आणि रेसिडेंट वाईल्डर व तिसरे रघुजी भोसले संबंध | डॉ. मोहन कापगते | 308 |

# सुरेश भटांच्या काव्यातील निसर्गचित्रण

**डॉ. राजेश देशपांडे**
मराठी विभागप्रमुख
श्रीकृष्णदास जाजू ग्रामीण सेवा महाविद्यालय,
पिपरी–वर्धा.
मो. ९८६०२१८२८१
deshpanderaj17@gmail.com

भावकाव्याला एका वेगळ्या उंचीवर नेणाऱ्या सुरेश भटांनी विशुद्ध निसर्गकविता लिहिलेली नाही. याचे कारण देताना भट म्हणतात, "निसर्ग ही माझी प्रेरणा कधीच नव्हती."[१] तरीसुद्धा भटांच्या काव्यातून निसर्गचित्रण थोड्याफार प्रमाणात आलेले आहे. भटांच्या काव्यातून प्रकटणारी प्रेमभावना निसर्गाच्या वेधक पार्श्वभूमीतून अवतरलेली आहे. निसर्गातील अनेक प्रतिमा त्यांच्या काव्यातून सहजपणे वावरताना दिसतात. या निसर्गप्रतिमांमुळेच त्यांच्या काव्याची परिणामकारकताही वाढलेली दिसते.

सुरेश भटांच्या 'रूपगंधा' ह्या काव्यसंग्रहातील 'आता कोठे' (पृ. १८), 'पुन्हा वीज चमकली' (पृ. २०), 'झुरणी' (पृ. २२), 'ही जुनीच पाऊलवाट' (पृ. ३३), 'सरले वादळ' (पृ. ४९), 'अजुनही....' (पृ. ५९), 'संध्याकाळ (पृ. ८२), 'सप्तरंग' ह्या काव्यसंग्रहातील 'आला गोड हिवाळा' (पृ. ६०), 'रसवंतीचा मुजरा' ह्या काव्यसंग्रहातील 'आज खिन्न चांदण्यांत' (पृ. २७), 'चल उचल पाऊल' (पृ. ३१), 'तरीही पण' (पृ. १०९) ह्या कवितांमधून निसर्गप्रतिमांच्या सहाय्याने भटांची प्रेमजाणीव साकार झालेली दिसते.

प्रेयसीचे उमलते तारुण्य हा भटांच्या प्रेमजीवनातील अतिशय महत्त्वाचा विषय आहे. तिचे उमलते तारुण्य, तिच्या जीवनातील वसंताचे आगमन, तिला साद देणारा निसर्ग, प्रेमरूपी मुग्ध कळीचा फुलात झालेला विकास इ. गोष्टी भट अगदी हळूवारपणे रेखाटतात.

'आता कोठे वसंताची
पडू लागली पाऊले!
जरा व्हावया लागली
काही कलिकांची फुले!
आता कोठे कोकिळेला
लव फुटलाहे गळा
आता कोठे आकारल्या
तुझ्या नव्हाळीच्या कळा!
(रूपगंधा, दु. आ., पृ. १८)

प्रेयसीच्या 'नव्हाळीच्या कळां'चा अंदाज घेऊन तिच्या 'लावण्याची गाथा' वाचताना भट अतिशय तन्मय होतात. निसर्गाची लाभलेली वेधक पार्श्वभूमी प्रेयसीच्या या 'लावण्यगाथेला' अधिक उठावदारपणा प्राप्त करून देते.

वसंत ऋतुच्या आगमनाने निसर्गात होणारे मनोवेधक बदल आणि प्रेयसीचे तारुण्यात पदार्पण होत असताना तिच्यात होणारे बाह्य व आंतरिक बदल ह्यांचा अतिशय सुरेख मिलाप भट साधतात. वसंताच्या आगमनाने बहरणारा निसर्ग, कळ्यांचे सुंदर फुलांमध्ये होणारे रूपांतर, आमराईत आपल्या धुंद सुगंधाने बेहोश

I N T E R N A T I O N A L R E S E A R C H F E L L O W S A S S O C I A T I O N

Impact Factor - 6.261 ISSN - 2348-7143

INTERNATIONAL RESEARCH FELLOWS ASSOCIATION'S

# RESEARCH JOURNEY

International E-Research Journal

PEER REFREED & INDEXED JOURNAL

May-2019

Special Issue No. 188 (B)

**Chief Editor -**
Dr. Dhanraj T. Dhangar,
Assist. Prof. (Marathi)
MGV'S Arts & Commerce College,
Yeola, Dist - Nashik [M.S.] INDIA

**Executive Editors :**
Prof. Tejesh Beldar, Nashikroad (English)
Dr. Gajanan Wankhede, Kinwat (Hindi)
Mrs. Bharati Sonawane-Nile, Bhusawal (Marathi)
Dr. Rajay Pawar, Goa (Konkani)

This Journal is indexed in :
- University Grants Commission (UGC)
- Scientific Journal Impact Factor (SJIF)
- Cosmoc Impact Factor (CIF)
- Global Impact Factor (GIF)
- International Impact Factor Services (IIFS)

For Details Visit To : www.researchjourney.net

SWATIDHAN PUBLICATIONS

| | | |
|---|---|---|
| 31 | डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या विचारांचा समग्र मराठी साहित्यावरील प्रभाव **डॉ. एस. डी. लांडे** | 158 |
| 32 | ऑनलाईन शिक्षण पद्धतीवर आधारित 'स्वयंम' या आधुनिक शैक्षणिक उपक्रमाची निर्मिती आणि कार्यपद्धती : एक अभ्यास **प्रा. ताराचंद पाटील व प्रा. हितेश ब्रिजवासी** | 161 |
| 33 | 'फेसाटी' : एक भयानक जीवन वास्तव **वसंत गावडे व डॉ. पांडुरंग भोसले** | 166 |
| 34 | पाणिनीय व्याकरणातील अन्वर्थसंज्ञाचे विश्लेषणात्मक अध्ययन **स्वाती धर्मे व हरेकृष्ण अगस्ति** | 171 |
| 35 | 'फॅन्ड्री' एक समाज वास्तवदर्शी चित्रण **अरुणा गायकवाड** | 179 |
| 36 | भटक्या-विमुक्तांची परिवर्तनाची चळवळ आणि नेतृत्व **डॉ.तातोबा बदामे** | 183 |
| 37 | दैवतगीते – मानवी समूहजीवनाचा आविष्कार **कैलास सदामत** | 187 |
| 38 | सुरेश भटांच्या काव्यातून प्रगटणारे आत्मचिंतन **डॉ.राजेश देशपांडे** | 191 |
| 39 | जागतिक तापमानवाढ करणे व प्रभाव **प्रा. एस.एस. पवार** | 198 |
| 40 | भारतातील दारिद्र्याविषयक अभ्यास **डॉ. के.पी.वाघमारे** | 201 |
| 41 | नव्वोदत्तरी आदिवासी कविता **डॉ. एस. डी. लांडे** | 206 |
| 42 | तुकाडोजींची गुरुदेव शक्ती **डॉ. प्रविण कारंजकर** | 210 |
| 43 | आनंदी गोपाळ – एक निरीक्षण **उज्ज्वला रोहमारे** | 213 |


*या अंकाचे सर्व अधिकार प्रकाशकांनी राखून ठेवले आहेत. प्रकाशक, संपादक यांच्या लेखी पूर्वपरवानगी शिवाय यातील लेखांचे पुनर्प्रकाशन करता येणार नाही. या विशेषांकातील लेखांतून/संशोधन निबंधांतून व्यक्त झालेली मते ही त्या संबधित लेखाच्या लेखकांची वैयक्तिक मते आहेत, त्याच्याशी संपादक, प्रकाशक सहमत असतीलच असे नाही. लेखांच्या मूळ स्वामित्व हक्काविषयीची (कॉपी राईट्स संदर्भातील) सर्वस्वी जबाबदारी संबंधित लेखकांची आहे.*

RESEARCHJOURNEY

'RESEARCH JOURNEY' International E- Research Journal
Impact Factor - (SJIF) - 6.261, (CIF) - 3.452(2015), (GIF)-0.676 (2013)
Multidisciplinary Issue
UGC Approved Journal
Special Issue No.188 (B)
ISSN : 2348-7143
May- 2019

# सुरेश भटांच्या काव्यातून प्रगटणारे आत्मचिंतन

डॉ. राजेश देशपांडे
मराठी विभागप्रमुख
श्रीकृष्णदास जाजू ग्रामीण सेवा महाविद्यालय,
पिपरी–वर्धा.
मो. ९८६०२१८२८१
deshpanderaj17@gmail.com

सुरेश भट यांच्या एकूणच काव्याचा सखोल अभ्यास केल्यास चिंतनशीलता हे त्यांच्या काव्याचे सर्वात महत्त्वाचे लक्षण आहे, हे लक्षात येते. ही चिंतनशीलता त्यांच्या प्रेमपर, सामाजिक, आत्मचिंतनपर अशा सर्वच विषयांवरील कवितांमधून प्रगटलेली असली, तरी सुरेश भट जेव्हा आपल्या काव्याच्या माध्यमातून आत्मशोध घेण्याचा प्रयत्न करतात, तेव्हा ही चिंतनशीलता अधिक प्रखरतेने व अधिक उत्कटपणे व्यक्त होताना दिसते.

चिंतनशीलता हा साहित्यिकाच्या व्यक्तिमत्त्वाचा महत्त्वाचा विशेष असतो. कवीच्या काव्यनिर्मितीमागील तो एक महत्त्वाचा घटक असतो. सुरेश भटांची अधिकांश कविता गझलेच्या आकृतिबंधात रचलेली असल्यामुळे त्यात चिंतनशीतलेला अधिक वाव मिळालेला आहे.

डॉ. अविनाश कांबळे म्हणतात त्याप्रमाणे, "गझलनिर्मिती ही सहजोत्स्फूर्त भावनांचा उद्रेक असते, त्याहून अधिक प्रमाणात गझलकाराच्या मनात बराच काळ घर करून राहिलेल्या व तेथे परिपक्व झालेल्या भावनांची व विचारांची उत्कट, प्रभावी अर्थपूर्ण, सौंदर्यपूर्ण अशी अभिव्यक्ती असते."[१] सुरेश भटांच्या आत्मचिंतनपर काव्यातून अभिव्यक्तीची ही सखोलता अधिक ठळकपणे प्रत्ययास येते. आत्मचिंतनाकरिता आवश्यक असणारी अंतर्मुखता व बहिर्मुखता यांची एकरूपताही भटांच्या कवितेतून जाणवत असल्यामुळे चिंतनशीलता हा भटांच्या काव्याचा विलोभनीय विशेष ठरतो.

सुरेश भटांच्या आत्यंतिक आत्ममग्नतेतून प्रगटणारी चिंतनशीलता 'रूपगंधा' पासून 'रसवंतीचा मुजरा' पर्यंत सर्वत्र अनुभवायला मिळते. त्यांच्या रूपगंधा, रंग माझा वेगळा, एल्गार, झंझावात, सप्तरंग व रसवंतीचा मुजरा या सहाही काव्यसंग्रहांमधील आत्मचिंतनपर कवितांची संख्या जवळपास २०५ एवढी विपुल प्रमाणात आहे.

सुरेश भट या आत्मकेंद्री कवितांमधून आपल्या वैयक्तिक जीवनाची चिकित्सा करताना दिसतात. सुरेश भटांच्या स्वकेंद्री कवितांचा विचार करताना असे लक्षात येते की, त्यांनी आपल्या खाजगी जीवनात अनुभवास आलेल्या मानहानी, अपमान, उपेक्षा इ. भावनांना अत्यंत गडदतेने आपल्या काव्यातून शब्दबद्ध केलेले आहे.

सुरेश भटांना त्यांच्या जीवनातील उपेक्षेचे चटके अगदी बालवयापसूनच सहन करावे लागले होते. अडीच वर्षाचे असताना त्यांना पोलिओसारखा जीवनभर पुरणारा आजार झाला. यामुळे प्राप्त झालेल्या पांगळेपणामुळे उपेक्षितपणाच्या अनुभवांचा पाया रचला गेला. पुढे–पुढे शिक्षणातील अरुचीमुळे जेमतेम बी.ए.ची पदवी तिसऱ्या प्रयत्नात पास झालेल्या सुरेश भटांना मनासारखी नोकरी प्राप्त झाली नाही व चरितार्थाकरिता वणवण भटकावे लागले. 'भणंगाचे जिणे' वाट्याला आल्यामुळे भटांच्या आयुष्यात सुरुवातीपासूनच अस्थिरता आलेली होती. तथाकथित सोबत्यांनी साधलेला स्वार्थ, समाजाने दाखविलेली अनुदारता व अगदी जिवाभावाचे म्हणवणाऱ्यांकडून झालेली उपेक्षा या अत्यंत कडवट अनुभवांचे प्रतिबिंब अगदी ठळकपणे त्यांच्या काव्यातून उमटलेले आहे.